दिः 25 फेब्रुवारी 2014

# भाजपा आणि अल्पसंख्याक

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

भाजपा अल्पसंख्यक मोर्चा आणि राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे आज नवी दिल्ली येथे एक संमेलन झाले. मी याच्या उद्घाटन सत्रात भाग घेतला. संमेलनाचे उद्घाटन पक्षाचे अध्यक्ष श्री राजनाथ सिंह यांनी केले. या संमेलनात भाग घेणा-या प्रतिनिधींची खुप जबरदस्त प्रतिक्रिया होती.

भाजपाला घेऊन अल्पसंख्यकांमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी मागील अनेक वर्षापासून एक सुनियोजित अभियान चालवले जात होते. पक्षाच्या कार्यकर्त्यांना अल्पसंख्यक समुदायाच्या सदस्यांना हे सांगण्यासाठी अनेक समस्यांचा सामना करावा लागला की भाजपाच्या मनात या समुदायाला घेऊन कोणताही पूर्वग्रह नाही आहे. नुकतीच काही अशी उदाहरणे पाहावयास मिळाली जिथे पक्षाच्या दृष्टिकोनाबद्दल अल्पसंख्याक समुदायाच्या सदस्यांनी स्तुती केली. दिल्ली आणि देशातील अन्य भागात 1984 च्या शिख विरोधी दंग्यांनंतर भाजपाचे शिख समुदायाचे सदस्यांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित झाले. पंजाब, दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड मध्ये शिख समुदायाचे भाजपा सदस्य राज्य विधानसभा आणि इतपत की संसदेत सुद्धा निवडून आले आहेत. देशभरात मोठ्या संख्येत शिख समुदायाचे राजनैतिक कार्यकर्ते भाजपासाठी कार्य करित आहेत.

गोवा विधानसभेसाठी झालेल्या मागील निवडणुकांत पक्षाने ख्रिश्चन समुदायाच्या सदस्यांना उभे केले. गोव्यात अधिकतर अल्पसंख्यक मतदात्यांनी भाजपाच्या बाजूने मतदान केले. ख्रिश्चन समुदाय आणि भाजपा दरम्यान गोव्यात उभारण्यात आलेली काल्पनिक भिंत ढासळली गेली. उपमुख्यमंत्र्यांसह आमचे अनेक मंत्री ख्रिश्चन समुदायाचे सदस्य आहेत. राजस्थान विधानसभेसाठी नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अल्पसंख्यक समुदायाचे चार सदस्य- दोन शिख आणि दोन मुस्लिम निवडले गेले आहेत. चारही भाजपाचे सदस्य आहेत. गुजरात आणि मध्यप्रदेशात मोठ्या संख्येत स्थानिय संस्थेतून सदस्य निवडून आले आहेत. भाजपात आमच्यासाठी ही मोठ्या गर्वाची बाब आहे की, आम्ही जिथे-कुठे विभिन्न अल्पसंख्यक समुदायाचे अनेक उमेदवारांना उभे केले आहे आणि या समुदायांमधून नेता तयार करण्याचा प्रयत्न केला आहे, आम्हाला मतदात्यांकडून चांगली प्रतिक्रिया मिळत आहे.

भाजपा आणि अन्य लोकांमध्ये फरक एवढाच आहे की आम्ही अल्पसंख्यकांचा राजनितीक शक्तीच्या साधनाच्या रुपात वापर करित नाही. आम्ही त्यांच्यासोबत बरोबरीचा व्यवहार करतो आणि त्यांच्या समस्यांना तशाचप्रकारे दूर करतो. आजच्या संमेलनात आम्ही घोषणा केली की, आमचा उद्देश भारताल दंगा मुक्त देश बनविणे आहे, जिथे अल्पसंख्यक समुदायाचे सदस्यांसह प्रत्येक नागरिकाला सुरक्षा मिळेल, जिथे सर्वांसोबत कोणत्याही भेदभावाशिवाय समान व्यवहार केला जाईल. आमती प्रतिज्ञा आहे की आम्ही प्रत्येक भारतीयाच्या आर्थिक विकासासाठी काम करणार ज्यात अल्पसंख्यक समुदायाचे सदस्य शामिल आहेत जेणेकरुन त्यांचे जीवनस्तर सुधारेल.

आज झालेल्या संमेलनात निर्णय घेतला गेला की, देशभरात आमचे समर्थक अशाप्रकारचे कमीतकमी हजारो संमेलन आयोजित करतील जेणेकरुन अल्पसंख्यक समुदायाच्या सदस्यांना भाजपाचा दृष्टिकोन सांगितला जाऊ शकेल आणि त्या चुकीच्या गैरसमजांना दूर केले जाईल जे आमच्या विरोधकांनी त्यांच्या डोक्यात निर्माण केले आहे.